क्र. १४२ पहिले वर्ष

# रविवारची उपासना

३० एप्रिल २०२३

## पुनरूत्थानानंतरचा चौथा रविवार

### प्रस्तावना

आजच्या शुभवर्तमानात ख्रिस्त म्हणतो, मी उत्तम मेंढपाळ असून मेंढरासाठी मी आपला प्राण देतो. ख्रिस्त आपला मेंढपाळ आहे. मेंढपाळ आपल्या मेंढरांच्या पुढे चालतो आणि आपल्या मेंढरांना योग्य मार्गाने घेऊन जातो. ख्रिस्त आपला मार्गदर्शन आहे. जे त्याची वाणी ऐकतात व त्याची आज्ञा पाळतात त्यांना ईश्वराच्या राज्यात प्रवेश मिळतो. ख्रिस्त आपल्यासाठी प्रवेशद्वार आहे. त्याच्यावाचून आपल्याला स्वर्गाच्या राज्यात प्रवेश नाही. आपण देवापासून, नीतीमत्तेपासून बहकू नये व सन्मार्गावर चालावे म्हणून आपण प्रार्थना करूया.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करू या.**

सर्वसमर्थ व नित्यजिवी परमेश्वरा, आमचा मेंढपाळ ख्रिस्त ह्याच्याकडून आम्हाला शक्ती दे व तुझ्या संतांमध्ये समावेश करण्यास आम्हाला स्वर्गाकडे ने. ही प्रार्थना आम्ही तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा एकच परमेश्वर तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

प्रभूशब्द विधी

### पहिले वाचन

**प्रेषितांची कृत्ये या पुस्तकातून घेतलेले वाचन** ३:१३-१५.१७-१९

**''देवाने त्याला प्रभू आणि ख्रिस्त केले आहे.''**

पेत्र अकरा प्रेषितांबरोबर उभा राहून त्यांना मोठ्याने म्हणाला, ''अहो यहुदी लोकांनो आणि यरुशलेमातील रहिवाशांनो, हे लक्षात आणा आणि माझे बोलणे ऐकून घ्या. इस्राएलच्या सर्व घराण्याने हे निश्चयपूर्वक समजून घ्यावे की ज्या येशूला तुम्ही क्रूसावर मारले त्याला देवाने प्रभू आणि ख्रिस्त केले आहे.''

हे ऐकून त्यांच्या अंत:करणास चुटपुट लागली आणि ते पेत्र आणि इतर प्रेषित ह्यांना म्हणाले, ''बंधुजनहो, आम्ही काय करावे?'' पेत्र त्यांना म्हणाला, ''पश्चात्ताप करा आणि तुमच्या पापांची क्षमा व्हावी म्हणून तुम्ही प्रत्येकजण येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घ्या, म्हणजे तुम्हाला पवित्र आत्म्याचे दान प्राप्त होईल. कारण हे वचन तुम्हांस, तुमच्या मुलांबाळांस आणि जे दूर आहेत त्या सर्वांस म्हणजे ज्यांना परमेश्वर आपला देव स्वत:कडे बोलावील त्यांना दिले आहे.'' त्याने आणखी दुसऱ्या पुष्कळ गोष्टी सांगून त्यांस साक्ष दिली आणि बोध करून म्हटले, ''ह्या कुटिल पिढीपासून तुम्ही आपला बचाव करून घ्या.'' तेव्हा त्यांनी त्याच्या संदेशाचा स्वीकार केला. त्यांचा बाप्तिस्मा झाला आणि त्या दिवशी त्यांच्यात सुमारे तीस हजार माणसांची भर पडली.

**हा प्रभूचा शब्द आहे**

### प्रतिसाद स्तोत्र

२२: १-२, ३-४, ५, ६

प्रतिसाद : **परमेश्वर माझा मेंढपाळ आहे.**

१ परमेश्वर माझा मेंढपाळ आहे
मला काही उणे पडणार नाही.
तो मला हिरव्यागार कुरणात बसवतो,
तो मला शांत पाण्याजवळ नेतो.
तो माझा जीव ताजातवाना करतो.

२ तो आपल्या नामास्तव मला नीतिमार्गाने चालवतो. मृत्युच्छायेच्या दरीतूनही मी
जात असलो तरी अरिष्टांस भिणार नाही.
कारण तू माझ्याबरोबर आहेस.
तुझी आकडी व तुझी काठी मला
धीर देतात.

३. तू माझ्या शत्रूच्या देखत माझ्यापुढे ताट वाढतोस. तू माझ्या डोक्याला तेलाचा
अभ्यंग करतोस, माझे पात्र काठोकाठ भरले आहे.

४. खरोखर माझ्या आयुष्याचे सर्व दिवस मला कल्याण आणि दया लाभोत आणि
परमेश्वराच्या घरात मी चिरकाल राहीन.

### दुसरे वाचन

**पेत्राचे पहिले पत्र यातून घेतलेले वाचन** २:२०-२५

**''तुमच्या मेंढपाळाकडे तुम्ही परत फिरला.''**

पाप केल्याबद्दल मिळालेला मार तुम्ही निमूटपणे सहन केल्यास त्यात काय मोठेपणा? पण चांगले केल्याबद्दल दु:ख भोगले आणि ते निमूटपणे सहन करणे हे देवाच्या दृष्टीने उचित आहे. कारण ह्याचकरिता तुम्हांस पाचारण करण्यात आले आहे, ख्रिस्तानेही तुम्हांसाठी दु:ख भोगले आणि तुम्ही त्याच्या पावलांवर पाऊल ठेवून चालावे म्हणून त्याने तुम्हांकरिता कित्ता घालून दिला आहे. त्याने पाप केले नाही आणि त्याच्या मुखात कपट आढळले नाही. त्याची निंदा होत असता त्याने उलट निंदा केली नाही. दु:ख भोगत असता त्याने धमकावले नाही. तर यथार्थ न्याय करणाऱ्यांकडे स्वत:ला सोपवून दिले. त्याने स्वत: तुमची आमची पापे स्वदेही वाहून क्रूसावर नेली, ह्यासाठी आपण पापाला मेलेले होऊन सदाचरणासाठी जगावे. त्याला बसलेल्या माराने तुम्ही निरोगी झाला आहा. तुम्ही मेंढरासारखे भटकत होता. परंतु आता तुमचा मेंढपाळ आणि संरक्षक ह्याच्याकडे तुम्ही परत फिरला आहा.

**हा प्रभूचा शब्द आहे**

### जयघोष

**योहान १०:१४**

**आलेलुया, आलेलुया!**
प्रभू म्हणतो, मी उत्तम मेंढपाळ आहे.
माझ्या मेंढरांना मी ओळखतो
आणि माझी मेंढरे मला ओळखतात.
**आलेलुया!**

## शुभवर्तमान

**योहानरलिखित शुभवर्तमानातून घेतलेले वाचन**

**"मी मेंढवाड्याचे दार आहे."**

येशू यहुद्यांना म्हणाला, "मी तुम्हांस खरोखर सांगतो, जो मेंढवाड्यात दाराने न जाता दुसरीकडून चढून जातो तो चोर आणि लुटारू आहे. जो दाराने जातो तो मेंढपाळ आहे. त्याच्यासाठी द्वारपाळ दार उघडतो. मेंढरे त्याची वाणी ऐकतात आणि तो आपल्या मेंढरांना ज्याच्या त्याच्या नावाने हाक मारतो आणि त्यांना बाहेर नेतो. तो आपली सर्व मेंढरे बाहेर काढल्यावर त्यांच्यापुढे चालतो आणि मेंढरे त्याच्यामागे चालतात. कारण ती त्याची वाणी ओळखतात. ती परक्याच्या मागे कधीच जाणार नाहीत. तर ती त्याच्यापासून पळतील. कारण ती परक्यांची वाणी ओळखत नाहीत." हा दृष्टांत येशूने त्यांना सांगितला. तरी ज्या गोष्टी तो त्यांच्याबरोबर बोलला त्या काय आहेत हे त्यांना समजले नाही.

ह्यास्तव येशू त्यांना पुन्हा म्हणाला, "मी तुम्हांला सत्य सांगतो की, मी मेंढरांचे दार आहे. जे माझ्यापूर्वी आले ते सर्व चोर आणि लुटारु आहेत. त्यांचे मेंढरांनी ऐकले नाही. मी दार आहे. माझ्याद्वारे कोणी आत जाईल तर त्याला तारणप्राप्ती होईल, तो आत येईल व बाहेर जाईल आणि त्याला खावयास मिळेल. चोर येतो तो केवळ चोरी, घात आणि नाश करावयास येतो. मी तर त्यांना जीवनप्राप्ती व्हावी आणि ती विपुलपणे व्हावी म्हणून आलो आहे."

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**प्रास्ताविक**

माझ्या बंधुभगिनींनो, ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाच्या आनंदासह आपण आपल्या परमेश्वरपित्याकडे प्रार्थना करू या. त्याच्या अतिप्रिय पुत्राच्या प्रार्थना त्याने ऐकल्या आणि स्विकारल्या: तो आपल्या मागण्या पूर्ण करील असा आपण विश्वास बाळगू या.

आपला प्रतिसाद असेल – **परमेश्वर मेंढपाळ माझा मजवर त्याची प्रीती. (गायनात)**

१. पोप, कार्डिनल्स, बिशप्स, फादर्स, सिस्टर्स व ब्रदर्स ह्यांना ख्रिस्ताची सुवार्ता जगाच्या कानाकोपऱ्यात सांगण्यासाठी धैर्य व शक्ति मिळावी, म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

२. प्रभूचा शब्द आपणा सर्वांनी मन:पूर्वक ऐकावा व ते आचरणात आणण्यास कृपा मिळावी, म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

३. प्रत्येक आईबापाने आपल्या लेकरांपुढे ख्रिस्तसभेच्या नीतिनियमांचा आदर्श ठेवावा व आपल्या मुलाबाळांवर चांगले संस्कार घडवून आणावेत, म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

४. आपल्या देशातील व साऱ्या जगातील आतंकवाद व दहशतवाद नाहीसा व्हावा व सगळीकडे शांती व्हावी, ही प्रार्थना आम्ही प्रभूचरणी करतो.

५. आपल्या कौटुंबिक व वैयक्तिक हेतूंसाठी, आपण प्रार्थना करूया,

## समारोप

हे स्वर्गीय पित्या, तुझ्या लोकांच्या या जीवनातील अनेक गरजांची तू जाणीव आहे. तुझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या सर्वांच्या प्रार्थना ऐक आणि त्यांचा स्वीकार कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

## अर्पणावरील प्रार्थना

हे प्रभो, या पुनरुत्थानाच्या दिव्य रहस्यांद्वारे आम्हाला नवजीवन दे आमच्या तारणकर्त्या प्रभूच्या अखंडित मुक्तिकार्यामुळे आम्हाला सर्वकाळचे सुख दे. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे सवसमर्थ बापा, सनातन मेंढपाळा, ख्रिस्ताच्या रक्ताने तारण प्राप्त झालेल्या तुझ्या कळपाचा सांभाळ कर व अभिवचनाच्या प्रदेशात त्याला घेऊन जा. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो

## चिंतन

पुनरूत्थानकाळातील चौथा रविवार हा उत्तम मेंढपाळ रविवार म्हणून पाळला जातो. आजची वाचने मेंढपाळ ख्रिस्त ह्याच्या जीवनातील तीन गुणवैशिष्ट्ये आपल्यासमोर सादर करतात :

**अ) मेंढपाळ आपल्याला हिरव्यागार कुरणात आणि संथ पाण्याकडे नेतो :** आजच्या पहिल्या वाचनात (प्रे.कृ.२:१४अ, ३६-४१) प्रारंभीच्या ख्रिस्तसभेचा मेंढपाळ पेत्र आपल्या कळपाला प्रथम प्रभूशब्दाच्या हिरव्यागार कुरणात नेतो. त्याच्या शब्दांनी ऐकणाऱ्यांच्या अंत:करणाला चुटपुट लागली. त्यानंतर पेत्र त्यांना बाप्तिस्म्याच्या संथ पाण्याकडे नेतो.

**ब) उत्तम मेंढपाळ आपल्या मेंढरांसाठी आपल्या प्राणाचे बलिदान करतो :** आजच्या दुसऱ्या वाचनात पुन्हा एकदा पेत्र (१ पेत्र.२:२०-२५) आपल्या वाचकांना 'आपला मेंढपाळ व संरक्षक येशू' ह्याच्या बलिदानाची आठवण करून देतो. पेत्राचा ख्रिस्ती समूह छळाला सामोरे जात होता. पेत्र त्यांना धीर धरून दु:ख सहन करण्यास प्रवृत्त करतो.

**क) उत्तम मेंढपाळ आपल्या मेंढरांना विपुल जीवन देतो :** आजच्या शुभवर्तमानात (योहान १०:१-१०) येशू निष्ठावंत मेंढपाळ आणि परका सांभाळकर्ता ह्यांच्यातील भेद स्पष्ट करतो. ह्या परक्यांना तो चोर व लुटारू म्हणतो. ते चोरी, घात व नाश करावयास येतात. येशू मात्र 'त्यांना जीवनप्राप्ती व्हावी आणि ती विपुलप्रमाणात व्हावी' म्हणून आपण आल्याचे प्रतिपादन करतो.

**आत्मपरीक्षण :** 'उत्तम मेंढपाळ' ह्या प्रतिमेच्या प्रकाशात माझे येशूशी असलेले नाते आणि इतरांशी असलेले नाते याविषयी मला कोणता संदेश मिळतो? माझ्या जीवनातील चोर व लुटारू कोण आहेत?

●●●

| मे २०२३ | दैनंदिन बायबल वाचने | चौथा सप्ताह |
|---|---|---|
| सोम १ | सं योसेफ कामगार (पां) | : प्रे. कृ. ११:१-१८/योहान १०: १-१० |
| मंगळ २ | सं अथनासियूस (तां) | : प्रे.कृ. ११:१९-२६/योहान १०:२२-३० |
| बुध ३ | सं फिलीप व सं जेम्स प्रेषित (पां) | : १ करिंथ.१५:१-८/ योहान १४:६-१४ |
| गुरु ४ | सं फ्लोरियन (पां) | : प्रे. कृ. १३:१३-२५/योहान १३:१६-२० |
| शुक्र ५ | सं आंजेलो (पां) | : प्रे.कृ.१३:२६-३३/योहान १४:१-६ |
| शनि ६ | सं डॉमणिक सावियो (पां) | : प्रे कृ. १३:४४-५२/योहान १४:७-१४ |